# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २१/०५/२०२३ (रविवार)

---

## घरफोडी

**पोलीस स्टेशन काटोल** :– अंतर्गत मुर्तीरोड धंतोली काटोल येथे यातील फिर्यादी हे त्यांचे परीवारासह बाहेरगावी गेले असता दिनांक १८/५/२३ ते १९/५/२३ चे रात्री दरम्यान, अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले नगदी दोन लाख रूपये चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– योगेश विठ्ठलराव पांडे वय ६६ वर्ष रा.मुर्ती रोड काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो उपनि दत्तात्रय कोलटे पोस्टे काटोल हे करीत आहे.

## अवैधरीत्या जनावरांची वाहतुक करणा–या आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली** :– अंतर्गत मौजा नांदगाव ते खापरचोडा रोड शिवार ६ किमी दक्षिण, येथे दिनांक २०/०५/२३ चे २०/०० ते २०.४५ वा दर. यातील आरोपी व त्यांचे ताब्यातील पिकअप गाडी क्र एम एच ३६ ए ए २४०६ मध्ये ५ म्हैसी व ५ हेले प्रत्येकि १२०००/–रू. एकुण कि. १,२०,०००/– रू चे गाडीत कोंबुन अवैद्यरित्या निदर्यतेने डांबुन कटाई करण्याकरीता घेवुन जातांना मिळुन आले. त्यांचे ताब्यातुन ५ म्हैसी व ५ हेले किमती १,२०,०००/रू. व पिकअप गाडी किमती ५,३०,०००/रू असा एकुण ६,५०,०००/रू चा माल जप्त केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरतर्फे पो उप नि महेश बोथले पो.स्टे अरोली यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे–१) महेश दुलीचंद डोये रा. सकरला ता. मोहाडी जि. भंडारा २) राजेश बालकदास फुंडे रा. नवेगाव ता. मोहाडी जि. नागपुर यांचे विरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ११(१) (क) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० सहकलम ५(१) (२), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना संदिप बाजनघाटे मो क्र ९५६१०३४२८७ हे करीत आहे.